# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- नक्षलवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्राला यश, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिल्लीतल्या बैठकीत माहिती
- अन्नपदार्थातली भेसळ रोखण्यासाठी देशभरात १०० प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार
- विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर
- सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक लांबणीवर

आणि

- सत्तरावे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज राष्ट्रपतींच्या हस्ते होणार प्रदान

****

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीची आज मतमोजणी होणार आहे. आज सकाळपासून प्रदेशातल्या वीस मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणीला सुरुवात होईल. हरियाणा विधानसभा निवडणुकीचीही मतमोजणी आज होणार आहे.

****

नक्षलवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्रानं मोठं यश मिळवलं असून, उत्तर गडचिरोली भाग हा सशस्त्र नक्षलवाद्यांपासून मुक्त झाल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची काल नवी दिल्लीत गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. भामरागड परिसरातल्या १९ गावांनी नक्षलवाद्यांना गावात येण्यास बंदी घातली

असून, आपल्या विकास धोरणाचं हे मोठं यश असल्याचंही मुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केलं.

राज्यात गेल्या दहा वर्षांत नक्षलविरोधी अभियान अधिक तीव्र झालं आहे. सशस्त्र नक्षलवादी कॅडरची संख्या २०१३ मध्ये ५५० होती, ती २०२४ मध्ये अवघी ५६ झाली आहे. गेल्या सहा वर्षात ९६ सशस्त्र माओवादी मारले गेले, १६१ पकडले गेले आणि ७० जणांनी आत्मसमर्पण केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

या बैठकीला महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री उपस्थित होते. अमित शाह यांनी यावेळी बोलतांना, नक्षलवादी कारवायांविरुद्धची लढाई अंतिम टप्प्यात असून, सर्व घटकांकडून सहकार्य मिळाल्यास, मार्च २०२६ पर्यंत देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल, असा विश्वास व्यक्त केला. नक्षलवादी मार्ग चोखाळणाऱ्या सर्वांनी शस्त्रांचा त्याग करून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन शाह यांनी केलं.

****

पूर्ण बांधणी झालेल्या नव्या परिवहन संवर्गातल्या वाहनांची नोंदणी करण्यासाठी चौथी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, साडेसात क्विंटलपेक्षा कमी सकल भार क्षमता असलेली चारचाकी वाहनांची नोंदणी अधिकृत वाहन वितरकांमार्फत होणार आहे. या निर्णयाचं ऑटोमोबाईल असोसिएशनच्यावतीने स्वागत करण्यात आलं आहे.

****

अन्नपदार्थातली भेसळ रोखण्याच्या दृष्टीनं तसंच गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीनं केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयातर्फे देशभरात १०० प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार आहेत. केंद्रीय अन्नप्रक्रिया आणि उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी काल नवी दिल्लीत फिक्कीतर्फे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात ही माहिती दिली. अन्नपदार्थांची नासाडी थांबवण्यासाठी रेडिएशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल असं ते म्हणाले. भारतीय मानकांना भविष्यात जागतिक मानकं म्हणून मान्यता मिळावी, तसंच उद्योग जगतानं देशातल्या उत्पादनांच्या विविधतेचा पूर्ण वापर करण्याचं आवाहन पासवान यांनी केलं.

****

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीचा सत्तावन्नावा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार, ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर झाला आहे.

समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. येत्या पाच नोव्हेंबरला रंगभूमी दिनी, सांगली इथं हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराबद्दल सुहास जोशी यांनी आकाशवाणीशी बोलतांना आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या...

***"हा विष्णूदास भावे पुरस्कार माझ्या दृष्टीने खूप खूप महत्वाचा आहे. कारण महाराष्ट्रातला एक महत्वाचा पुरस्कार तो आहे. आणि पन्नास वर्ष काम केल्याचं चीज झालं असं आज वाटतंय. आणि ज्या पद्धतीनं पन्नास वर्ष मी काम करत आलेय, त्याचा हा गौरव महाराष्ट्राने केलाय असं मला वाटतंय आणि खूप आनंद झाला."***

****

महाराष्ट्र सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे ३१ डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचा शासन आदेश काल जारी झाला. अडीचशे पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.

****

पश्चिम महाराष्ट्रातलं मराठवाड्याच्या हक्काचं पाणी उजनी धरणातून १४६ कीलोमीटर पाइपलाईनद्वारे थेट सीना नदीपात्रात सोडलं जाणार आहे. काल या कामासाठी राज्य सरकारने २७६ कोटी रुपयांचा कार्यारंभ आदेश दिला आहे. दीर्घकालीन बाबींचा विचार करून घेतलेल्या या धोरणात्मक निर्णयामुळे, तुळजापूरसह लोहारा आणि उमरगा तालुक्यातल्या दहा हजार ८६२ हेक्टर क्षेत्राला मोठा लाभ होणार असल्याची माहिती आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दिली. एकूण सहा टप्प्यात येणारं हे दोन पूर्णांक २४ टीएमसी पाणी डिसेंबरअखेरपर्यंत तुळजाभवानी देवीच्या चरणी असलेल्या रामदरा प्रकल्पात पोहोचेल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला. दरम्यान, धाराशिव तालुक्यात तेर इथं संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरासमोरील सभामंडपाच्या कामाचा शुभारंभ, प्रकाश बोधले महाराज यांच्यासह संप्रदायातल्या मान्यवरांच्या हस्ते काल करण्यात आला. आमदार पाटील यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

सत्तरावे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान केले जाणार आहेत. या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीची आज सहाव्या माळेला मुरली अलंकार महापूजा बांधली जाणार आहे. काल नवरात्र महोत्सवाच्या पाचव्या माळेला रथ अलंकार महापूजा बांधण्यात आली होती. भगवान सूर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला, अशी आख्यायिका यामागे सांगितली जाते.

****

सफाई कामगारांसंदर्भात असणारे कायदे, त्यांच्या सुविधा, शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचं काटेकोर पालन, नांदेड महानगरपालिका आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये झालं पाहिजे, असं राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य पी.पी.वावा यांनी म्हटलं आहे. काल नांदेड इथं यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. नांदेड महानगरपालिकेतल्या आणि जिल्ह्यातल्या इतर नगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सद्य:स्थितीचा त्यांनी यावेळी आढावा घेतला.

****

युवकांनी शिक्षण घेऊन सुशिक्षित होत असतांनाच सुसंस्कारितही व्हावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'युवा संवाद' या उपक्रमास कालपासून सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. व्यक्तिमत्व चांगलं असणं, म्हणजे त्याचा बौद्धिक विकास झालेला असणं होय, आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपल्या संस्कारापासून दूर जात आहोत, याकडे स्वामी यांनी लक्ष वेधलं. युवासंवाद या कार्यक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केलं.

****

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व नोडल अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण पार पडलं. निवडणुकीचं कामकाज करतांना सर्व विभागांचा समन्वय आवश्यक असल्याचं,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी नमूद केलं. मतदार जनजागृती करुन नैतिक मतदानाचं महत्त्व मतदारांना पटवून देण्याचं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

****

नांदेडमध्ये परवा दहा ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महिला सक्षमीकरण मेळावा होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी काल कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर भेट देऊन या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

****

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था, साहित्य भारती आणि कलाविष्कार अकादमी धाराशिव तर्फे पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. काल धाराशिव इथं आयोजित अभिजात मराठी अभिमान सभेत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

****

उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानास ग्रामविकास आणि पंचायत राज विभागामधील शासनाचा एक नियमित विभाग म्हणून मान्यता देणं, त्याअंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणं, यासह अन्य मागण्यांसाठी नांदेड इथं काल उमेद अंतर्गत कार्यरत महिला आणि कर्मचाऱ्यांनी आंदोलन केलं. मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष इरवंत सूर्यकर यांनी दिला.

दरम्यान, बीड इथंही जिल्हा परिषद कार्यालयासमोर उमेद– महिला आणि कर्मचारी संघटनेच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन सुरू करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं बौद्ध लेणी परिसरातल्या प्रस्तावित कारवाईच्या विरोधात काल शहरातून मोर्चा काढण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात बौद्ध धर्मगुरु, वकील संघाचे सदस्य, आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बौद्ध लेणीला जागतिक तीर्थस्थळ म्हणून दर्जा द्यावा, यासह अन्य मागण्या मोर्चकऱ्यांनी यावेळी केल्या.

दरम्यान, मातंग समाजाच्या वतीने काल छत्रपती संभाजीनगर इथं आरक्षण क्रांती पदयात्रा काढण्यात आली. विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत गेलेल्या या पदयात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते.

****